सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था , पुणे
२८, राणीचा बाग, जुने सर्किट हाउस जवळ , पुणे ४११००१
दूरध्वनी : ०२० - २६३६२०७१

क्र. आसंप्रसं/२०२४/स्पर्धा परीक्षा/ का. ०४/2659 दि.20/09/2024

**महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातीच्या उमेदवारांसाठी घेण्यात आलेल्या सामायिक प्रवेश परीक्षेच्या निकालाबाबत तसेच नामवंत खाजगी प्रशिक्षण संस्थेमधून योजनानिहाय देण्यात येणाऱ्या प्रशिक्षण कार्यक्रमाबाबतच्या महत्वाच्या सूचना...**

महाराष्ट्र राज्यातील स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रमाच्या विविध योजनांमध्ये एकसमानता आणण्यासाठी सर्वंकष धोरण आखण्यात आले असून त्याबाबत दिनांक ३१.०१.२०२४ रोजी मा. मुख्य सचिव, यांच्या दालनात मा. अ.मु.स. (वित्त) यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत टीआरटीआय, सारथी, बार्टी पुणे, महाज्योती नागपूर, अमृत व मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळ, मुंबई या संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रमांची अंमलबजावणी व सनियंत्रण करण्याची जबाबदारी आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्यावर सोपविण्यात आली. या अनुषंगाने, सर्वंकष धोरणांतर्गत स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रमाच्या विविध योजनांचा अनुसूचित जमातीच्या उमेदवारांना लाभ मिळावा यासाठी माहे जुलै व ऑगस्ट, २०२४ मध्ये महाराष्ट्रातील विविध परीक्षा केंद्रावर सामायिक प्रवेश परीक्षा घेण्यात आल्या. त्या परीक्षेमध्ये अनुसूचित जमातीच्या उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची योजनानिहाय गुणांकन यादी (Merit List) व प्रतीक्षा यादी (Waiting List) आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

सदर सूचना फक्त अनुसूचित जमातीच्या उमेदवारांसाठी देण्यात आलेल्या आहेत. अनुसूचित जमातीच्या सर्व उमेदवारांना योजनानिहाय निकालाच्या अनुषंगाने देण्यात आलेल्या महत्वाच्या सूचना खालील प्रमाणे...

१. टीआरटीआयच्या संकेतस्थळावर फक्त अनुसूचित जमातीच्या उमेदवारांच्या घेतलेल्या सामायिक प्रवेश परीक्षेचा निकाल प्रसिद्ध करण्यात आलेला आहे. दिनांक ३० ऑगस्ट, २०२४ ला झालेल्या पहिल्या टप्प्यातील प्रवेश परीक्षेच्या निकाल यादी व दि. ०९ सप्टेंबर, २०२४ ला दुसऱ्या टप्प्यातील झालेल्या प्रवेश परीक्षेची निकाल यादी संबंधित संस्थांना आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेमार्फत ईमेलद्वारे पाठविण्यात आलेली आहे. त्यानुसार संबंधित संस्था आपल्या संस्थेच्या संकेतस्थळावर त्यांच्या उमेदवारांसाठीचा निकाल जाहीर करण्याची जबाबदारी ही संबंधित संस्थेची राहील.

२. स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रमाच्या प्रवेशासाठी आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या संकेतस्थळावर संस्था निवडीबाबतची विकल्प लिंक देण्यात येणार आहे. उमेदवारांसाठी सदर विकल्प लिंक ही लवकरच सुरू करण्यात येईल व त्याची माहितीही या संस्थेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

३. ज्या योजनेसाठी प्रवेश घेतलेला आहे त्या योजनेचा जितका कालावधी आहे त्या कालावधीचा प्रशिक्षण कार्यक्रम हा उमेदवाराला पूर्ण करणे बंधनकारक आहे. या प्रशिक्षण कालावधी दरम्यान इतर कोणत्याही कारणास्तव उमेदवाराला सदर प्रशिक्षण कार्यक्रम अर्धवट सोडता येणार नाही.

४. उमेदवारांनी सामायिक प्रवेश परीक्षा (CET) देतांना आवश्यक व मागणी केलेले कागदपत्रे जे प्रवेश परीक्षा अर्जासाठी उपलोड केले होते त्या आधारे उमेदवारांना CET देता आली त्या उमेदवारांच्या कागदपत्रांची तपासणी ही त्यांच्या प्रवेशानंतर प्रशिक्षण संस्थेमध्ये करण्यात येईल व सर्व कागदपत्रांच्या तपासणी अंती एखादा उमेदवार अपात्र ठरल्यास त्याचा प्रवेश रद्द करून त्याच्या जागी प्रतीक्षा यादीतील उमेदवारांची निवड करण्यात येईल. सदर प्रक्रिया मा. आयुक्त, आ.सं.प्र.सं. यांच्या मान्यतेने पार पाडली जाईल.

५. उमेदवाराने विकल्प लिंककरीता विकल्प निवडीचा जितका कालावधी दिलेला आहे त्याच कालावधीत नोंदणी करणे अनिवार्य आहे. उमेदवाराने जर विहित कालावधीत योजना विकल्प निवड केली नाही तर त्या उमेदवारांचा प्रवेश रद्द करून त्याच्या जागी प्रतीक्षा यादीतील उमेदवारास प्राधान्य दिले जाईल.

६. पात्र उमेदवारांनी एकापेक्षा अधिक योजनेसाठी अर्ज केला असल्यास त्यांना त्यांच्या संस्था निवडीच्या विकल्प लिंक वर जाऊन त्याच्या पसंतीक्रमानुसार एकच योजना निवड करण्याची मुभा आहे. योजना निवड केल्यानंतर उमेदवारास इतर कोणत्याही योजनेचा लाभ घेता येणार नाही तसेच एकदा निवड केलेली योजना रद्द करता येणार नाही किंवा योजना बदलूनही दिली जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

७. अनुसूचित जमातीच्या उमेदवारांना प्रवेश प्रक्रियेसाठी ज्या काही सूचना निर्गमित करण्यात येणार आहेत त्या फक्त टीआरटीआयच्या संकेतस्थळावरून दिल्या जाणार आहेत त्यामुळे उमेदवारांनी वारंवार टीआरटीआयच्या संकेतस्थळाला भेट देणे अनिवार्य आहे.

८. आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रमाच्या विविध योजनांपैकी फक्त एकाच योजनेचा लाभ घेता येईल.

९. उमेदवाराने खोटे किंवा बनावट कागदपत्रे सादर करून योजनेचा लाभ घेतला असल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराकडून संपूर्ण प्रशिक्षणाचा खर्च वसूल करून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१०. आरक्षण नियमानुसार महिला व दिव्यांग, अनाथ यांच्यासाठी जागा आरक्षित ठेवल्या जातील. परंतु आरक्षित जागेवर महिला व दिव्यांग, अनाथ प्रवर्गातील पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर जागा अनुसूचित जमातीतील गुणानुक्रमे पात्र असलेल्या उमेदवारास प्राधान्य दिले जाईल.

११. उमेदवारांनी निवड केलेल्या प्रशिक्षण संस्थेत प्रशिक्षणासाठी तात्काळ रुजू होणे बंधनकारक आहे तसेच प्रशिक्षण सुरू होण्याच्या दिनांकापासून १० दिवसाच्या आत रुजू झाल्याचे हमीपत्र या प्रशिक्षण संस्थेकडे जमा करून जे उमेदवार दिलेल्या तारखेपासून १० दिवसाच्या आत रुजू होत नाहीत, अशा उमेदवारांची निवड रद्द करून प्रतीक्षा यादीतील उमेदवारांची गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल. अपवादात्मक परिस्थितीमध्ये योग्य निर्णय घेण्याचा अधिकार मा. आयुक्त आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचा असेल.

१२. सदरचा प्रशिक्षण कार्यक्रम अनिवासी व नियमित स्वरूपाचा आहे त्यामुळे विद्यार्थ्यांनी आपली निवास व्यवस्था स्वतः करावयाची आहे. तसेच जितके कालावधीचा प्रशिक्षण कार्यक्रम आहे तो नियमितपणे पूर्ण करणे अनिवार्य आहे.

१३. सदर योजनेच्या अंमलबजावणीत काही अडचणी उद्धवल्यास त्यात उचित बदल करण्याचे अधिकार मा. आयुक्त आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांना असतील.

१४. सदर प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये उमेदवारांना योजनानिहाय मिळणाऱ्या लाभाचा सविस्तर तपशील विकल्प लिंकच्या पानावर उपलब्ध करून देण्यात आले आहेत त्याची नोंद उमेदवारांनी घ्यावी.

उमेदवाराला संस्था प्रवेशासाठी आवश्यक शैक्षणिक तसेच इतर कागदपत्रे निवड केलेल्या संस्थेकडे खाली नमूद केल्याप्रमाणे सादर करावयाची आहे.

१. अनुसूचित जमातीचे मूळ प्रमाणपत्र प्रत.
२. अनुसूचित जमातीचे वैधता मूळ प्रमाणपत्र प्रत.

३. दहावी गुणपत्रिका किंवा मूळ प्रमाणपत्र प्रत.
४. बारावी गुणपत्रिका किंवा मूळ प्रमाणपत्र प्रत.
५. पदविका/पदवी गुणपत्रिका किंवा मूळ प्रमाणपत्र प्रत.
६. पदव्युत्तर पदवी गुणपत्रिक किंवा मूळ प्रमाणपत्र प्रत.
७. वयाचा पुरावा दर्शविणारा खालीलपैकी जन्मदाखला, दहावी उत्तीर्ण प्रमाणपत्र, पासपोर्ट, ड्रायविंग लायसन्स, पॅन कार्ड यापैकी कोणतेही एक कागदपत्रे.
८. आधारकार्ड मूळ छायांकित प्रत.
९. डोमिसाईल मूळ प्रमाणपत्र प्रत.
१०. आधारकार्ड लिंक असलेले उमेदवाराचे बँक तपशील – पास बुक प्रत किंवा cancel cheque
११. तहसीलदार कार्यालयातून निर्गमित केलेला मागील तीन वर्षाचा मूळ उत्पन्नाचा दाखला प्रत – (आर्थिक वर्ष २०२१-२२, २०२२-२३, २०२३-२४)
१२. दिव्यांग असल्यास, संबंधित जिल्हा शल्य चिकित्सक (सिव्हील सर्जन) यांनी निर्गमित केलेला दिव्यांगत्वाचा दाखल्याची प्रत.
१३. अनाथ असल्यास, संबंधित उपायुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय यांनी निर्गमित केलेला अनाथाचा दाखला प्रत.
१४. अद्यावत फोटोग्राफ (Passport size photo) ०२ कॉपी

(चंचल पाटील)
सहसंचालक,
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,पुणे.

# सर्वकंष धोरणातंर्गत स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण कार्यक्रम योजनेचा तुलनात्मक तक्ता

| अ. क्र. | योजनेचे नाव | लाभार्थी संख्या | कालावधी | टीआरटीआय मार्फत देण्यात येणाऱ्या सुविधा | | प्रवास खर्च | प्रशिक्षण शुल्क (संस्थेला देय) | प्रशिक्षण संस्थेमार्फत देण्यात येणाऱ्या सुविधा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | विद्यावेतन | अनुषंगिक खर्च (पुस्तक संच रक्कम एकदाच) | | | |
| १. | दिल्ली संघ लोकसेवा आयोग (UPSC) यांच्याकडून घेण्यात येणाऱ्या नागरी सेवा स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण योजना | १०० | ११ महिने | १३,००० | १८,००० | १०,००० | २,००,००० | • एकात्मिक अभ्यासक्रमानुसार व्याख्यांने<br>• अतिथी व्याख्याने<br>• अभ्यासक्रमाशी निगडीत पुस्तके /नोट्स<br>• २४ तास ग्रंथालय सुविधा (वर्तमानपत्रे, नियतकालिके इ. प्रशिक्षण कार्यक्रमाशी निगडीत)<br>• टेस्ट सिरीज<br>• Wi-Fi |
| २. | (महाराष्ट्र) पुणे येथे संघ लोकसेवा आयोग (UPSC) यांच्याकडून घेण्यात येणाऱ्या नागरी सेवा स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण योजना | १०० | ११ महिने | १३,००० | १८,००० | - | १,००,००० | |
| ३. | महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC) यांच्याकडून राज्य सेवा स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण योजना | ४०० | ११ महिने | १०,००० | १२,००० | - | ७५,००० | |
| ४. | उमेदवारांसाठी MPSC मार्फत घेण्यात येणाऱ्या विधी या पदांकरिता स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण योजना | ५० | ११ महिने | १०,००० | १२,००० | - | ७५,००० | |
| ५. | उमेदवारांसाठी MPSC मार्फत घेण्यात येणाऱ्या अभियांत्रिकी या पदांकरिता स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण योजना | ५० | ११ महिने | १०,००० | १२,००० | - | ७५,००० | |
| ६. | उमेदवारांसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगमार्फत घेण्यात येणाऱ्या PSI, STI, ADO ई. तत्सम पदांकरीता स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण योजना | ४०० | ०६ महिने | १०,००० | १२,००० | - | ५०,००० | |
| ७. | बँक (IBPS) रेल्वे, एलआयसी NABRARD (Grade A & B), SBI, (PO/SO/ Clerical), RBI, Insurance, LIC, Regional Rural Banks (RRB), (PO/Clerical) and other Banking Competitive Examination | १००० | ०६ महिने | ६,००० | १०,००० | - | ४०,००० | |

<table>
<tr><th rowspan="2">अ. क्र.</th><th rowspan="2">योजनेचे नाव</th><th rowspan="2">लाभार्थी संख्या</th><th rowspan="2">कालावधी</th><th colspan="2">टीआरटीआय मार्फत देण्यात येणाऱ्या सुविधा</th><th rowspan="2">प्रवास खर्च</th><th rowspan="2">प्रशिक्षण शुल्क (संस्थेला देय)</th><th rowspan="2">प्रशिक्षण संस्थेमार्फत देण्यात येणाऱ्या सुविधा</th></tr>
<tr><th>विद्यावेतन</th><th>अनुषंगिक खर्च (पुस्तक संच रक्कम एकदाच)</th></tr>
<tr><td>८.</td><td>केंद्रीय सेवेमार्फत घेण्यात येणाऱ्या वर्ग - ३ च्या पदांकरीता स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम योजना (Saff Selection Commission)</td><td>४००</td><td>०६ महिने</td><td>१०,०००</td><td>१२,०००</td><td>-</td><td>५०,०००</td><td rowspan="4">• एकात्मिक अभ्यासक्रमानुसार व्याख्यांने<br>• अतिथी व्याख्याने<br>• अभ्यासक्रमाशी निगडीत पुस्तके /नोट्स<br>• २४ तास ग्रंथालय सुविधा (वर्तमानपत्रे, नियतकालिके इ. प्रशिक्षण कार्यक्रमाशी निगडीत)<br>• टेस्ट सिरीज<br>• Wi-Fi</td></tr>
<tr><td>९.</td><td>MPSC/राज्यातील इतर नियुक्ती प्रधिकरणाकडून घेण्यात येणाऱ्या वर्ग ३ च्या पदांकरिता स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण योजना</td><td>८००</td><td>०६ महिने</td><td>१०,०००</td><td>१२,०००</td><td>-</td><td>५०,०००</td></tr>
<tr><td>१०.</td><td>पोलीस भरती पदांकरिता स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण देणे (आदिवासी उपयोजना क्षेत्रातील एकूण १६ जिल्ह्यात प्रति जिल्हा १००० उमेदवार व आदिवासी उपयोजना बाह्य क्षेत्र प्रति जिल्हा ३५० उमेदवार)</td><td>२३०००</td><td>०६ महिने</td><td>१०,०००</td><td>१२,०००</td><td>-</td><td>५०,०००</td></tr>
<tr><td>११.</td><td>शिक्षक पात्रता परीक्षा (TET) पदांकरिता स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण योजना</td><td>५००</td><td>०६ महिने</td><td>१०,०००</td><td>१२,०००</td><td>-</td><td>५०,०००</td></tr>
</table>

(चंचल पाटील)
सह संचालक,
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे